# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

जा.क्र./रातुमनावि/म.वि.वि./२०२३/७२० दिनांक ८.१.२०२३

## जाहिरात

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या बृहत आराखडयातील तरतुदीनुसार शैक्षणिक सत्र २०२३–२०२४ करिता नवीन महाविद्यालये/नवीन विद्याशाखा/नवीन अभ्यासक्रम/नवीन विषय/अतिरीक्त तुकडया करीता अर्ज मागविण्याबाबत

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाकरीता महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाद्वारे मंजुर करण्यात आलेल्या बृहत आराखडयानुसार सत्र २०२३–२०२४ या कालावधीकरीता नवीन महाविद्यालये/ नवीन विद्याशाखा/ नवीन अभ्यासक्रम/नवीन विषय/अतिरीक्त तुकडयाकरीता इच्छूक संस्था/अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांकडुन दिनांक १५.०१.२०२३ रोजी सायंकाळी ५.४० पर्यंत विद्यापीठाच्या **www.nagpuruniversity.ac.in** या संकेतस्थळावरील **Online College Section** या लिंकद्वारे किंवा **www.onlinedcudrtmnu.org** या संकेतस्थळामार्फत ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहे.

ज्या संस्थांना नवीन महाविद्यालयाकरिता तसेच अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांना नवीन विद्याशाखा/नवीन अभ्यासक्रम/नवीन विषय/अतिरीक्त तुकडया करिता अर्ज सादर करावयाचे आहे, त्या संस्था/महाविद्यालयांना ऑनलाईन अर्जासाठी रु. ५५०/– विद्यापीठाच्या प्रकाशन विभागात भरुन बृहत आराखडयाची प्रत विकत घेऊन ऑनलाईन प्रक्रिया शुल्क रु. १६००/– विद्यापीठाच्या वित्त व लेखा विभागातील आगम विभागात भरुन त्याची पावती विद्यापीठाच्या जमनालाल बजाज प्रशासकीय भवन, महात्मा फुले शैक्षणिक परिसर, अमरावती रोड, नागपूर येथील महाविद्यालय विकास विभाग येथे दिनांक १३.०१.२०२३ पर्यंत किंवा तत्पुर्वी कार्यालयीन वेळेत सादर करुन **User-ID** व **Password** प्राप्त करणे आवश्यक राहील. त्याशिवाय विद्यापीठ अधिसूचना क्रमांक: लेखा/व्यय/सा/७०, दिनांक २७.०४.२०१२ प्रमाणे अर्ज शुल्क वित्त व लेखा अधिकारी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर हयांचे नांवे काढलेल्या धनाकर्षाद्वारे किंवा रोखीद्वारे वित्त व लेखा विभागात जमा करुन त्याची पावती ऑनलाईन अर्जासोबत दिनांक १५.०१.२०२३ पर्यंत किंवा तत्पुर्वी सादर करावी. तसेच ऑनलाईन अर्जाची प्रिन्ट आऊट घेऊन सहपत्रांसह (पान क्रमांक नमुद करुन) क्रमवार पध्दतीने अर्ज शुल्काच्या पावतीसोबत एकुण ३ प्रतीत हार्डकॉपी अर्ज सॉफ्ट कॉपीसह (तिनही प्रतीत **C.D.** असणे आवश्यक आहे) विद्यापीठाच्या महाविद्यालय विकास विभाग, जमनालाल बजाज प्रशासकीय भवन, महात्मा फुले शैक्षणिक परिसर, अमरावती रोड, नागपूर या कार्यालयात दिनांक १६ जानेवारी, २०२३ रोजी सायंकाळी ५.४० पर्यंत किंवा तत्पुर्वी सादर करावा.

वरिलप्रमाणे नवीन महाविद्यालये/नवीन विद्याशाखा/नवीन अभ्यासक्रम/नवीन विषय/अतिरीक्त तुकडया याकरिता महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाकडुन (**MAHED**) मंजुर बृहत आराखडयानुसार तसेच शासन निर्णय दिनांक १३.०९.२०१७ व १५.०९.२०१७ मधील तरतुदीनुसार प्राप्त होणाऱ्या पात्र अर्जांचा विचार केला जाईल तसेच बृहत आराखडयाबाहेरच्या ठिकाणासाठी नवीन महाविद्यालयाकरिता अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

संस्था/महाविद्यालयांना ऑनलाईन अर्ज सादर करण्याकरिता आवश्यक असलेल्या मागदर्शक सूचना व इतर माहिती **www.onlinedcudrtmnu.org** या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली आहे.

मा. कुलगुरुंचे आदेशान्वये

(डॉ.रमण मदने)
उपकुलसचिव
महाविद्यालय विकास विभाग